दिनांक २६/०७/२०२१

# सापळा केस

**आलोसे आनंदा नारायन गायकवाड, तलाठी सज्जा कावलगाव ता.पुर्णा जि.परभणी (वर्ग—३), यांनी ५,०००/— रू लाच मागणी केल्याचे यशस्वी लाच मागणी कारवाई**

यातील तक्रारदार यांनी अे.सी.बी.परभणी येथे दि. ०८/०७/२०२१ रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की. नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांना त्यांनी विकत घेतलेल्या शेतीचा फेर लावून देण्यासाठी ५,०००/— रूपये लाचेची मागणी केली आहे. त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक ०९.०७.२०२१ रोजी तक्रारदार यांना नमुद आलोसे यांनी त्यांचे शेतीचे नावाचे फेर लावून देण्यासाठी ५,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेने. त्यांचे विरूध्द पो.स्टे. चुडावा येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री.राजेश पुरी पोह/हनुमंते, पोना/कटारे, पोना/कुलकर्णी, पोशि/धबडगे, पोशि/चट्टे, पोना/शेख मुखीद, पोशि/शेख मुक्तार, चापोह/चौधरी, चापोना/कदम अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२—२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक, ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ८८८८८४१९६५
श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ९६६५४७९३३३
श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी — ७०२१००२११०
श्री.राजेश पुरी, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी — ९९२२४५६२२२